# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 21 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २१ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणी दुहेरी चौकशीसह मकोकाअंतर्गत कारवाई तर परभणीतल्या संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित–एक देश एक निवडणूक विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय
- राज्यशासनाचा मोहम्मद रफी पुरस्कार गायक जावेद अली यांना जाहीर

आणि

- नांदेड जिल्ह्यातल्या देगलूर पंचायत समितीला आयएसओ मानांकन

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणी दुहेरी चौकशीसह मकोकाअंतर्गत कारवाई तर परभणीतल्या संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या दोन्ही घटनांसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला ते काल उत्तर देत होते. बीड जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषी कोणीही असले, तरीही मकोका अंतर्गत संघटित गुन्ह्याअंतर्गत कारवाई करू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. ते म्हणाले..

> ***‘‘या निमित्ताने या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो, आज जो काही गुन्हा घडला आहे याचा मास्टरमाईंड कोणीही असला तरी, त्याच्यावर कारवाई केली जाईल. आपण वारंवार वाल्मिक कराडचं नाव घेतलं म्हणून नाव घेऊन सांगतो, जर वाल्मिक कराड बद्दलचे पुरावे***

***असतील, तर तो कोण आहे, कुठल्या पक्षाचा आहे, कुणाकुणासोबत फोटो आहे याचा विचार न करता कारवाई केली जाईल. या सगळ्या प्रकरणांमध्ये कुठेतरी पोलीस प्रशासनाची कुचराही दिसत असल्यामुळे बीडच्या एस पीं ना ट्रान्सफर करण्याचा निर्णय हा या ठिकाणी मी घेतलेला आहे.''***

या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल तसंच विशेष तपास पथकामार्फतही संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाणार असल्याचं, फडणवीस यांनी सांगितलं…

***''या प्रकरणांमध्ये दोन प्रकारची चौकशी आम्ही करणार आहोत. एक आईजी लेवल अधिकारी, यांच्या अंतर्गत एसआयटी तयार केलेली आहे. ही एसआयटी या प्रकरणाची पूर्ण चौकशी करेल. आणि दुसरीकडे, कारण शेवटी एसआयटी चौकशी करताना गुन्ह्याच्या अनुषंगाने करते, ईकोसिस्टीमच्या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे म्हणून न्यायालयीन चौकशी देखील या संपूर्ण प्रकरणाची केली जाईल.''***

परभणी प्रकरणात बोलतांना, मुख्यमंत्र्यांनी, या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करणार असल्याचं सांगितलं. पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी अतिरिक्त पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. परभणीत घडलेली पहिली अप्रिय घटना ही ज्या व्यक्तीनं केली, ती मनोरुग्ण असल्याचं वैद्यकीय अहवालातून स्पष्ट होत असल्याचं फडणवीस म्हणाले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या आंदोलनावर नियंत्रण मिळवतांना, अटक झालेले आणि न्यायालयीन कोठडीत दगावलेले सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू, श्वसनाच्या विकाराने झाल्याचं वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. मृत सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीची घोषणाही त्यांनी केली..

***''अशोक घोरबांड यांना सस्पेंड करून याची चौकशी पूर्णपणे केली जाईल की त्यांनी वाजवीपेक्षा अधिक बळाचा वापर केला आहे का? ज्यावेळी सगळी जाळपोळ चालू होती, त्यामुळे जाळपोळीच्या***

***व्हिडिओमध्ये जी मंडळी दिसतात त्यांना अटक करण्यात आली, त्यात सूर्यवंशीना अटक करण्यात आली होती. ते पूर्णवेळ पोलीस कस्टडीत असताना चे व्हिडिओ फुटेज उपलब्ध आहेत, अनएडिटेड. या पूर्ण व्हिडिओ फुटेज मध्ये कुठेही त्यांना मारहाण केल्याचं दिसत नाही. त्यांना सीओपीडी म्हणजे श्वसनाचा दुर्धर आजार आहे आणि ब्रेथलेसनेस आहे असं त्यांच्या मेडिकल एक्झामिनेशन मध्ये लिहिलेलं आहे. तथापि, त्यांच्या कुटुंबाला दहा लाख रुपयांची मदत ही राज्य सरकारच्या वतीने केली जाईल आणि या सगळ्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल.''***

परभणी इथल्या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे आंबेडकरवादी कार्यकर्ते मृत विजय वाकोडे यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत फडणवीस यांनी जाहीर केली आहे.

****

विधानसभेत काल नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या, यावेळी झालेल्या चर्चेत आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहरासह राज्यातल्या महत्त्वकांक्षी प्रकल्पांबाबात भूमिका मांडली. लातूर इथल्या नियोजित माता आणि बाल रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न त्वरित सोडवावा, अशी मागणी देशमुख यांनी केली.

****

मुंबईत मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाला गती देऊन ते जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. ते काल उच्चाधिकार समितीच्या बैठकीत बोलत होते.

****

संसदेचं हिवाळी अधिवेशन काल संस्थगित झालं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कालही दोन्ही सदनात गदारोळ केला. या गदारोळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली दोन विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव दोन्ही सदनांत मांडण्यात आला. त्यानंतर संसदेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

दरम्यान या अधिवेशनात लोकसभेची कार्यक्षमता ५४ टक्के तर राज्यसभेची कार्यक्षमता ४० टक्के राहिली, प्रत्येक संसद सदस्याने याचा विचार करायला हवा, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे.

****

राज्यशासनाच्या १८ व्या मोहम्मद रफी पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. प्रसिद्ध गीतकार मजरूह सुलतानपुरी यांना मरणोत्तर मोहम्मद रफी जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून, मोहम्मद रफी पुरस्कार गायक जावेद अली यांना जाहीर झाला आहे. मुंबई इथं २४ डिसेंबरला हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जाणार आहेत.

****

दैनिक देशदूतचे संस्थापक, आणि प्रख्यात उद्योजक देवकिसन सारडा यांचं काल नाशिक इथं अल्प आजारानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासह विविध संस्थांमधे त्यांनी अनेक पदं भूषवली. काल संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सारडा यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दु:ख व्यक्त केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या देगलूर पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झालं आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केलं. तसंच आयएसओ मानांकन प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांना प्रदान केलं. पंचायत समितीच्या या यशाचा हा संक्षिप्त आढावा...

> ***''हे मानांकन बहाल करतांना, केंद्र तसंच राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, परिणामकारक पर्यवेक्षण, लाभार्थ्यांना तत्पर सेवा आणि झिरो पेंडन्सी अशा विविध बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केलं गेलं. पंचायत समितीनं सामान्य प्रशासन, शिक्षण, पंचायत, कृषी तसंच पशुसंवर्धन, आरोग्य, महिला आणि बालविकास, रोजगार, तसंच स्वच्छता आणि पाणी पुरवठा आदी विभागामध्ये केलेल्या प्रभावी कामगिरीच्या बळावर हे मानांकन मिळालं आहे...''***

****

महाराष्ट्र पोलीस अकादमीचा १२४ वा दीक्षांत सोहळा काल नाशिक इथं पार पडला. प्रशिक्षण पूर्ण केलेले ४१० पुरूष आणि २१० महिला उपनिरीक्षकांची तुकडी पोलीस दलात दाखल झाली. यामध्ये धाराशिवसह अन्य बालगृहातून बाहेर पडलेल्या पाच अनाथ वंचित तरुणांचा समावेश आहे.

****

शून्य कुष्ठरुग्ण प्रसार अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून कुष्ठमुक्त सुरक्षित अभियान `कुसुम` मोहीम राबवण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी या मोहिमेबाबत अधिक माहिती दिली....

***सद्यस्थितीमध्ये जालना जिल्ह्यामध्ये एकूण ७४ कुष्ठरूग्ण आढळून आलेली आहेत. ही मोहीम प्रामुख्याने वीटभट्टी कामगार, त्याच्यानंतर खाम कामगार, तसेच ऊसतोड कामगार या भागांमध्ये काम करणाऱ्या मजुरांची तपासणी करून रूग्ण सापडतात का या उद्देशाने राबवण्यात येत आहे. आणि आत्तापर्यंत वीस रूग्ण या मोहिमेमध्ये शोधण्यात आलेले आहेत.***

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राष्ट्रीय कुष्ठरोग निमुर्लन मोहिमेत वीट भट्टी कामगार, बांधकाम मजूर, कारागृहातील कैदी, आश्रम शाळेतील विद्यार्थी, ऊस तोड कामगार अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांची तपासणी करण्यात आली. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ विशाल बेंद्रे यांनी ही माहिती दिली.

****

धाराशिव तालुक्यातील वर्ग २ मधील मदतमाश जमिनी वर्ग १ मध्ये करण्याच्या कामकाजासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तहसील कार्यालयात दर बुधवारी या समितीचे शिबिर होणार असल्याची माहिती तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी दिली.

****

ग्राहक जनजागृती पंधरवडा अंतर्गत लातूर जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. काल जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीनं कार्यक्रम

घेण्यात आला. येत्या २४ तारखेला जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात ग्राहक हक्काबाबत माहिती दिली जाणार आहे.

****

रेल्वे मार्गाच्या कामामुळे धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस उद्या २२,२३,२६, २७, २९ आणि ३० डिसेंबरला धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर काही गाड्या उशीरानं धावणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती दिली.

****